# बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद्

द्वारा भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, विधी महाविद्यालय मार्ग, पुणे – ४११००४

**अकरावे अधिवेशन, अमरावती**
**पहिले परिपत्रक**

प्राच्यविद्येच्या अभ्यासाची मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. पुण्याच्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराने इ.स. १९१८ मध्ये स्थापन केलेल्या अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषदेची अधिवेशने भारतातील वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित होत असतात. महाराष्ट्रातील आणि बृहन्महाराष्ट्रातील मराठीभाषिकांना तसेच महाराष्ट्रीय संस्कृतीच्या अभिमानी लोकांना प्राच्यविद्येसंबंधातील विचारांचे आदानप्रदान आपल्या भाषेतून करता यावे याकरिता इ.स. १९९६ मध्ये बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेची स्थापना करण्यात आली. स्थापनेपासून परिषदेची दहा अधिवेशने (पुणे १९९६, ठाणे १९९७, संगमनेर १९९९, नागपूर २००२, कुंडई (गोवा) २००३, भोपाळ २००५, मुंबई २००७, रत्नागिरी २००९, जळगाव २०११ आणि पुणे २०१३) संपन्न झाली. या अधिवेशनांना प्राच्यविद्येच्या अभ्यासकांचा आणि विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. परिषदेचे अकरावे अधिवेशन अमरावतीच्या शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे.

अधिवेशनाचा कालावधी : **गुरुवार दिनांक १० ते शनिवार दिनांक १२ डिसेंबर २०१५**

अधिवेशनस्थळ : **शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती – ४४४६०४**

आपण या अधिवेशनाचे सदस्य व्हावे आणि अधिवेशनामध्ये सहभागी व्हावे ही विनंती.

आपले

भगवान् पण्डा
**स्थानिक सचिव,**
**अकरावे अधिवेशन**

श्री. शं. बहुलकर
**सचिव,**
**बृ.प्रा.परिषद्, पुणे**

==============================================

:: आवेदनपत्रातील तपशील सर्वार्थाने पूर्ण भरलेले असावे.

:: अधिवेशनात वाचल्या जाणाऱ्या निबंधाचा सारांश मागील पानावर दिलेल्या सूचनांनुसार असावा.

:: अधिवेशनाचे सदस्यताशुल्क ₹३००/- आणि व्यवस्थाशुल्क ₹१,२००/- (एकूण ₹१,५००/-) इतके राहील. ते **सचिव, बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद्** यांच्या नावे काढलेल्या, पुणे येथे देय असणाऱ्या डीडीद्वारे अथवा 'सीटीएस्-२०१०' मानकाच्या मल्टिसिटी चेकद्वारे अथवा पुण्यातील बँकशाखेच्या चेकद्वारे पाठवावे. **शुल्कामध्ये कोणत्याही सवलतीची अपेक्षा नसावी.**

:: **रोख रक्कम, मनिऑर्डर अथवा पुण्याबाहेरचे चेक्स स्वीकारले जाणार नाहीत.**

:: एकाहून अधिक सदस्यांचा एकच डीडी/चेक काढल्यास त्यासोबत स्वतंत्र कागदावर रकमेचा हिशेब लिहून पाठवावा. तसेच प्रत्येक आवेदनपत्रावर डीडीचा/चेकचा तपशील व्यवस्थित भरलेला असावा.

:: **एकाहून अधिक व्यक्तींना संयुक्तपणे निबंध सादर करावयाचा असल्यास त्यात सहभागी असणाऱ्या सर्व सदस्यांनी पूर्ण शुल्क भरणे अपेक्षित आहे. तसे नसल्यास संबंधित व्यक्तीचे नाव स्वीकारण्यात येणार नाही.**

:: **आवेदनपत्र, निबंधसारांश आणि शुल्क स्वीकारण्याचा अंतिम दिवस शनिवार, दिनांक १४ नोव्हेंबर २०१५**

:: आवेदनपत्र, निबंधसारांश आणि शुल्क पाठविण्याकरिता पत्ता — **सचिव, बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद्, द्वारा भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर, विधी महाविद्यालय मार्ग, पुणे – ४११००४**

## अधिवेशनामधील विषयविभाग

(१) वेद आणि अवेस्ता, (२) व्याकरण आणि भाषाशास्त्र,

(३) अभिजात साहित्य (संस्कृत, प्राकृत, पाली, इतर भारतीय भाषा, 'अरबी, फ़ारसी, इत्यादी विदेशी भाषा)

(४) धर्म आणि तत्त्वज्ञान, (५) इतिहास आणि पुरातत्त्वविद्या,

(६) प्राचीन विज्ञान आणि तंत्रज्ञान, (७) विदर्भ इतिहास आणि संस्कृती.

## निबंधासंबंधी...

(१) वरील विषयविभागांपैकी कोणत्याही एका विभागामध्ये मराठी, हिन्दी, संस्कृत किंवा इंग्रजी भाषेमध्ये शोधनिबंध सादर करता येईल.

(२) कोणत्याही व्यक्तीचे सदस्यत्व अथवा निबंध स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार परिषदेकडे राहतील.

(३) निबंधाची एक संगणकमुद्रित / टंकलिखित प्रत संबंधित विभागाध्यक्षांकडे निबंध सादर करण्यापूर्वी द्यावी.

(४) निबंधाच्या वाचनास १५ मिनिटे तर त्यावरील चर्चेकरिता ५ मिनिटे उपलब्ध असतील.

(५) निबंधवाचनाकरिता एल्.सी.डी.प्रोजेक्टर विनंतीप्रमाणे उपलब्ध होईल. फाँटसंबंधीच्या समस्या टाळण्याकरिता निबंधवाचकाने आपल्या प्रेझेंटेशनची पी.डी.एफ्. प्रतही सोबत आणावी.

## निबंधसारांशासंबंधी...

(१) निबंधसारांश जास्तीत जास्त ३०० शब्दांत असावा.

(२) निबंधसारांश परिषदेकडे शक्यतो ई-मेलने पाठवावा. तो युनिकोड प्रणालीमध्ये टाइप केलेला असावा. तसेच त्याची पी.डी.एफ्. प्रतही सोबत जोडलेली असावी.

(३) या निबंधसारांशाची ए-फोर अथवा फूलस्कॅप कागदावर छापलेली एक प्रत आवेदनपत्रासोबत पाठवावी.

(४) अत्यंत अपरिहार्य कारणास्तव निबंधसारांश ई-मेलने पाठवणे शक्य नसल्यास तो कागदाच्या एकाच पृष्ठभागावर सुवाच्य हस्ताक्षरात लिहिलेला / टंकलिखित / संगणकमुद्रित असावा. मजकुराच्या चारही बाजूंना २.५ सेंटिमीटर (सुमारे एक इंच) इतक्या रुंदीचे समास सोडलेले असावे. निबंधसारांशाच्या कागदावर संबंधित मजकुराव्यतिरिक्त इतर कोणताही मजकूर असू नये.

(५) सारांशाच्या सुरुवातीला निबंधाचे शीर्षक, अपेक्षित विषयविभाग आणि निबंधलेखकाचे नांव लिहिलेले असावे.

(६) निबंधसारांशाचे आणि सादर केल्या जाणाऱ्या निबंधाचे भाषामाध्यम एकच असावे.

==========================================================

## संपर्क

**डॉ. श्रीनन्द लक्ष्मण बापट**, सहसचिव, बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद्, पुणे — मोबाईल **९८५ ०९८५ ९३५**

**डॉ. भगवान् पण्डा,** स्थानिक सचिव, अकरावे अधिवेशन — मोबाईल **९३२५५ ३२२६५**

**प्रा. पंकजा वाघमारे,** संस्कृत विभाग, शा.वि.ज्ञा.वि. संस्था, अमरावती — मोबाईल **९४२३७ ७९३२३**

(काही कारणाने फोन कॉलला प्रतिसाद न मिळाल्यास कृपया आपल्या नामोल्लेखासह एस्.एम्.एस्. पाठवावा.)

**ई-मेल** – bmpppune@gmail.com

# बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद्

**अकरावे अधिवेशन, दिनांक १० ते १२ डिसेंबर २०१५ : : शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती**

(ई-मेल, निबंध इंग्रजीत असल्यास निबंधशीर्षक आणि स्वाक्षरी वगळता इतर तपशील देवनागरी लिपीतच भरावे.)

माननीय सचिव, बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद्, पुणे, यांस ——

मी बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेच्या दिनांक १० ते १२ डिसेंबर २०१५ या काळात अमरावती येथे होणाऱ्या अकराव्या अधिवेशनाचा / ची सदस्य होऊ इच्छितो / इच्छिते.

**पूर्ण नांव –** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**पूर्ण पत्ता –** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . **पिनकोड –** . . . . . . . . . . .

**दूरध्वनी क्र.** ( . . . . . . . . . . ) . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . **मोबाईल –** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**ई-मेल –** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**शैक्षणिक अर्हता –** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . **जन्मदिनांक** . . . . / . . . . /१९ . . . .

**व्यवसाय –** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . **धारण केलेले पद –** . . . . . . . . . . . . . . . . .

**मी अधिवेशनामध्ये निबंध सादर करणार आहे / नाही.**

**माझ्या निबंधाचा विषयविभाग** (योग्य क्रमांकावर ✓ अशी खूण करा.)

(१) वेद आणि अवेस्ता, (२) व्याकरण आणि भाषाशास्त्र,
(३) अभिजात साहित्य, (४) धर्म आणि तत्त्वज्ञान,
(५) इतिहास आणि पुरातत्त्वविद्या, (६) प्राचीन विज्ञान आणि तंत्रज्ञान,
(७) विदर्भ इतिहास आणि संस्कृती

**निबंधाचे शीर्षक –** . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

**निबंधसारांश ई-मेलने पाठवलेला आहे / नाही // निबंधसारांश सोबत जोडलेला आहे / नाही.**

**मला निबंधवाचनाकरिता एल्.सी.डी. प्रोजेक्टर आवश्यक आहे / नाही.**

अधिवेशनाचे सदस्यताशुल्क ₹३०० आणि व्यवस्थाशुल्क ₹१,२००, एकूण **₹१,५०० (रुपये एक हजार पाचशे मात्र)** सोबतच्या चेकद्वारे / डी.डी.द्वारे पाठवीत आहे. त्याचा स्वीकार व्हावा ही विनंती.

**चेक/डीडी क्र.** . . . . . . . . . . . . . . . **, दिनांक** . . . . / . . . . **/२०१५, बँक –** . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

कळावे

आपला / आपली विश्वासू